| | |
|---|---|
| MHNS180011922015 | दाखल दिनांक: ०१.०९.२०१५<br>नोंदणी दिनांक : ०१.०९.२०१५<br>निकाल दिनांक: १७.०४.२०२६<br>कालावधी : व. म. दि.<br>१० ०७ १६ |

**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळवण यांचे न्यायालयात**

( पिठासीन अधिकारी : एम. व्ही. जावळे )

**नि. दि. दा. क्र.७८/२०१५.** **नि.क्र.९३**

**०१. श्री. मोहन सोंडा शेवाळे**
वय– ६५ वर्षे, धंदा– शेती

**०२. सौ. मंगलबाई मोहन शेवाळे (मयत)**

**२अ. श्री.खुशाल मोहन शेवाळे**
वय– २५ वर्षे, धंदा– शेती
रा. मोकभणगी, ता.कळवण,
जि.नाशिक

**२ब. सौ.योगिता सागर आहिरे**
वय– ३२ वर्षे, धंदा– व्यापार
रा.फ्लॅट क्र.००१, माऊली कृपा
अपार्टमेंट, जिल्हा परिषद शाळेजवळ
द्वारली, कलयाण पुर्व.

**०३. श्री. भास्कर सोंडा शेवाळे**
वय– ५५ वर्षे, धंदा– शेती

**०४. सौ. सरलाबाई भास्कर शेवाळे**
वय– ५० वर्षे, धंदा– शेती
क्र.१ व २ रा. दरेभणगी, मळयात

ता.कळवण, जि.नाशिक.

क्र.३ व ४ रा. मोकभणगी,

ता.कळवण, जि.नाशिक.                    **... वादी.**

**विरुध्द**

**०१. श्री. राजाराम सोंडा शेवाळे**

वय– ७५ वर्षे, धंदा– शेती

**०२. श्री.निवृत्ती राजाराम शेवाळे**

वय– ५२ वर्षे, धंदा– शेती

**०३. श्री.भरत राजाराम शेवाळे**

वय– ५० वर्षे, धंदा– शेती

सर्व रा.दरेभणगी, मळयात

ता.कळवण, जि.नाशिक.                    **... प्रतिवादी.**

**दावा :– ठराव करुन मिळणेसाठी व निरंतर ताकीद मनाई हुकूमाकरीता..**

---

वादींतर्फे विधीज्ञ : श्री.एन.पी. चंद्रात्रे.

प्र.वादींतर्फे विधीज्ञ : श्री.बी.डी.देशमुख.

---

## न्या य नि र्ण य

( दिनांक १७ एप्रिल, २०२६ रोजी घोषीत )

वादीने प्रस्तुत दावा हा मौजे रा. दरेभणगी, ता.कळवण, जि.नाशिक येथील मिळकत गट क्रमांक २२०/१ क्षेत्र ०१हे–०४आर अधिक पोटखराबा ००हे–३६आर, गट क्रमांक २२०/२ क्षेत्र ०१हे–४४आर व गट क्रमांक २२०/३ क्षेत्र ००हे–३६आर अधिक पोटखराबा ०१हे–१३आर हे क्षेत्र वाटपाप्रमाणे वादींच्या मालकीचे व वहिवाटीतील असुन वादींना पुर्वेकडुन १० फुट रुदीच्या रस्त्याने वापरण्याचा हक्क व अधिकार आहे असे जाहीर होउन मिळण्याकरीता व सदर

मिळकतींच्या उपभोगास प्रतिवादी अथवा त्यांच्यामार्फत इतर कोणीही वादींना कोणत्याही प्रकारे हिल्लाहरकत करु नये अशी निरंतर ताकीद मनाईहुकूम देण्यात यावा याकरीता दाखल केला आहे. सदर मिळकती या दाव्याचा विषय आहे. (यापुढे सदर वाद विषयाला थोडक्यात "दावा मिळकती" असे संबोधण्यात येत आहे).

०२. **वादींच्या दाव्याची संक्षिप्त हकीकत पुढीलप्रमाणे :**

मिळकत गट क्र.२२० चा मुळ स.नं.१६९/१ असा आहे. वादी क्र.०१ व ०३ आणि प्रवादी क्र.०१ चे वडी सोंडा सावळा पाटील यांनी सदर मिळकत राजाराम मिला मोरे यांचेकडुन दि.१९/०४/१९६७ रोजी रजिस्टर खरेदीखताने विकत घेतली असुन त्यानुसार नोंद क्र.१३ प्रमाणित झाली आहे. त्यानंतर १९८२ साली सोंडा पाटील यांनी त्यांच्या नावावर असलेल्या मिळकतीचे तहसिलदार यांच्या परवानगीने मुलांमध्ये वाटप करून दिले त्याबाबत ड पत्रक नोंद क्र.७१ प्रमाणित झाली आहे. सदर वाटपानुसार गट क्र.२१३/ब सोंडा सावळ गट क्र.२२०/१ प्रतिवादी क्र.०१ राजाराम सोंडा, गट क्र.२२०/२ वादी क्र.०१ मोहन सोंडा, गट क्र.२२०/३ प्रकाश सोंडा व गट क्र.२२०/४ भास्कर सोंडा यांच्या नावाने करण्यात आली होती. सदर वाटपानुसार नोंद क्र.७१ प्रमाणित झाली आहे.

०३. वादींचे पुढे कथन की, वादी क्र.०१ व प्र.वादी क्र.०१ यांना प्रकाश सोंडा नावाचा भाऊ होता. प्रकाश सोंडा दि.२९/०५/१९८९ रोजी मयत झाला. मयत प्रकाश अविवाहीत होता. त्यामुळे, त्याच्या नावावरील मिळकतींना वादी क्र.०१, ०२ व प्र.वादी क्र.०१ यांची त्याचे कायदेशीर वारस म्हणून नावे लागली आहेत. प्रकाश सोंडा मयत झाला त्यावेळी गट क्र.२१३/अ/१ व गट क्र.२२०/३ या मिळकती त्याच्या नावावर होत्या. प्रकाश मयत झाल्यानंतर वादी व प्र.वादी यांनी त्याच्या नावावरील क्षेत्र ०१ हे-०८आर आप-आपसात वाटुन घेतले आहे व त्याप्रमाणे ते सदर क्षेत्र वहिती करीत होते.

**०४.** वादींचे पुढे कथन की, प्रकाश सोंडा मयत झाल्यानंतर वादी क्र.०१, ०३, प्र.वादी क्र.०१ व त्यांची बहिण जनाबाई अभिमन हिचेही नाव गट क्र.२१३/अ/१ व गट क्र.२२०/३ या मिळकतींना लागले होते. परंतु, समजुतीने जनाबाई यांनी त्यांचा मिळकतीत असलेला हिस्सा भावांच्या लाभात सोड्डुन दिला आहे. त्यावेळी वादी, प्र.वादी तसेच जनाबाई यांनी आपआपसात वाटप करून घेतले असुन सदर वाटपानुसार शेतांची आपआपसात आदलाबदल करुन घेतली असुन त्याप्रमाणे वादी क्र.०१, ०३ व प्र.वादी क्र.०१ हे सन २००७ सालापासुन ज्याच्या–त्याच्या शेताची वहिती करीत आहेत. वादींचे पुढे कथन की, वादी व प्रतिवादींनी आपापल्या हिश्यात जाण्या–येण्याकरीता स्वतंत्रपणे पूर्व बाजुला दक्षिणेकडून उत्तरेपर्यंतच्या हिश्यात जाण्यासाठी १० फुट रुंदीचा रस्ता ठेवला आहे. वादी व प्रतिवादी सदर रस्त्याने शेतात ये–जा करीत असतात.

**०५.** वादींचे पुढे कथन की, त्यानंतर वादी व प्रतिवादींनी कब्जा वहिवाटीप्रमाणे तिनही भावांमध्ये पोट हिश्याची मोजणी करुन हिस्से निश्चित करून घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी भुमी अभिलेख कार्यालयाकडे मोजणी करीता अर्ज सादर केला होता व त्यानुसार दि.१७/०४/२०१५ रोजी भुकरमापक यांनी शेतावर येउन मोजणी केली. त्यानुसार वादी व प्रतिवादी यांच्या कब्जा वहिवाटीत असलेले हिश्यांचे पोटहिस्से करुन मोजणी नकाशा तयार केला. तसेच, हिस्सा फॉर्म क्र.०४ देखिल कब्जा वहिवाटीप्रमाणे तयार करण्यात आला असून त्याप्रमाणे ७/१२ उता–यात दुरुस्ती करण्यात येणार आहे. परंतु अद्याप हिस्सा फॉर्म क्र.०४ प्रमाणे संबंधीत तलाठी कार्यालयात ७/१२ उतारे तयार झालेले नाहीत. त्यामुळे वादींनी पुर्वीच्या नोंदीप्रमाणे असलेले उतारे दाखल केले आहेत. परंतु आज रोजी दावामिळकती वादी क्र.०१, ०३ व प्रतिवादी क्र.०१ यांच्या कब्जेवहिवाटीत आहेत.

**०६.** वादींचे पुढे कथन की, सदर मोजणी प्रमाणे गट क्र.२२०/१ चा उत्तरेकडील भाग वादी क्र.०३ व ०४ यांच्या कब्जेवहिवाटीत आहे. गट क्र.२२०/२ हे मधले क्षेत्र प्रतिवादी क्र.०१ च्या कब्जावहिवाटीत आहे. तसेच गट क्र.२२०/३ वादी क्र.०१ व ०२ यांचे कब्जा वहिवाटीत आहे. सदर पोट हिश्याची मोजणी मान्य असल्याबाबत वादी व प्र.वादींनी सहया केल्या आहेत. त्याप्रमाणे मुकरमापक यांनी हिस्सा फॉर्म नं.४ व पोटहिश्याचा नकाशा तयार केला आहे. येणेप्रमाणे सदर क्षेत्र हे ज्याच्या-त्याच्या कब्जात सन २००७ मध्ये झालेल्या वाटपापासुन आहे. वादींनी त्यांचे क्षेत्र बागायत केले आहे.

**०७.** वादींचे पुढे कथन की, सदर मिळकतीचे पुर्व बाजुने दक्षिणेकडे असलेल्या शीवपांदीने पुर्व बाजुकडुन १० फुट रुंदीचा वापराचा रस्ता दक्षिणेकडुन उत्तरेकडे जाण्या-येण्यासाठी वादी व प्रतिवादींना सामाईक ठेवण्यात आला असुन त्याची नोंद ७/१२ उता-यावर घेण्यात आली आहे. त्याप्रमाणे वादी क्र.०३ व ०४ सदर रस्त्याचा वापर त्यांच्या गट क्र.२२०/१ या मिळकतीत जाण्याकरीता करत असतात. त्याचप्रमाणे प्र.वादी क्र.०१ देखिल सदर रस्त्याचा वापर करीत असतो. परंतु ०२ ते ०३ महिन्यांपासुन प्रतिवादींनी आडदांडपणा सुरु केला असुन वादींना रस्त्याचा वापर करू देत नाही. तसेच, प्रतिवादी गट क्र.२२०/३ वरील वादी क्र.०१ व ०२ यांच्या कब्जावहिवाटीस हिल्ला हरकत करीत आहेत. तसेच, प्रतिवादी नाला बुजवुन जाणीवपूर्वक वादींची अडवणूक करत असतात. वादी क्र.०२ वर शस्त्रक्रिया झाली असुन त्यालाही रस्त्याच्या वापरास प्र.वादी विनाकारण हरकत करतात. वास्तविक पोटहिश्याची मोजणी होवुन ज्याचे-त्याचे हिस्से निश्चित करण्यात आले आहेत. तसेच, जाण्या-येण्याकरीता सर्वांना सामाईक रस्ता ठेवण्यात आला आहे. परंतु, प्र.वादींच्या वरील कृत्यामुळे वादींना मिळकतीत वहिती करणे अशक्य झाले

आहे. वादी क्र.०१ व ०३ यांनी त्याबाबत संबंधीत पोलीस स्टेशनला तक्रारी दिलेल्या आहेत. परंतु पोलीसांनी त्याबाबत कोणताही प्रतिबंधात्मक उपाय केला नसल्यामुळे याचा गैरफायदा घेउन प्रतिवादी वादींच्या कब्जेउपभोगास व रस्त्याच्या वापरास हिल्ला हरकत करत आहेत. सबब, वादींनी प्रस्तुत दावा खर्चासह मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०८.** प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी नि.क्र.१४ वर कैफियत तथा प्रतिदावा दाखल करुन प्रस्तुत दाव्यास प्रखर विरोध दर्शविला आहे. प्रतिवादींचे कथन असे की, वादीचा दाव्यातील मजकुर खरा व कायदेशीर नाही. प्रतिवादींचे पुढे कथन असे की, सन १९८२ साली सोंडा सावळा पाटील यांनी त्यांच्या नावावर असलेल्या दावा मिळकती वादी क्र.०१, ०३ व प्रतिवादी क्र.०१ यांचेत वाटप करून दिल्या आहेत. गट क्रमांक २२० मध्ये वाटपा पुर्वीपासून पूर्व–पश्चिम अशा ४ पट्टया (४ भाग) बांध घातले होते. सोंडा सावळा – पाटील यांनी सदर ४ पट्ट्या (४ भाग) त्यांचे ४ मुले राजाराम सोंडा, मोहन सोंडा, प्रकाश सोंडा, भास्कर सोंडा यांचेत वाटप करून दिले. त्या वाटपाप्रमाणे गट क्रमांक २२० यातील दक्षिणेकडुन क्र.०१ ची पट्टी प्र.वादी क्र.०१ राजाराम सोंडा यांना दिली. दक्षिणेकडून क्र.०२ ची पट्टी वादी क्र.०१ मोहन सोंडा यांचे वाटणीस दिली. दक्षिणेकडून क्र.०३ ची पट्टी प्रकाश सोंडा यांचे वाटणीस दिली व उत्तरेकडील शेवटची क्र.०४ ची पट्टी भास्कर सोंडा शेवाळे वादी क्र.०३ यांचे वाटणीस दिली आहे. त्यानुसार आजतागायत गट क्रमांक २२० वादी व प्रतिवादी यांच्या मालकी हक्काने कब्जेवहिवाटीत आहे.

**०९.** प्रतिवादींचे पुढे कथन असे की, त्याप्रमाणे दक्षिणेकडून क्र.१ ची पट्टी जी प्र.वादी क्र.१ यांना वाटपाने देणेत आली त्याचा गट नंबर २२०/१ असुन दक्षिणेकडून क्र.२ ची पट्टी वादी क्र.१ यांना वाटपाने देणेत आली त्याचा गट नंबर २२०/२ हा आहे तसेच दक्षिणेकडून क्र.३ ची पट्टी जी प्रकाश सोंडा यांना देणेत

आली त्याचा गट नंबर २२०/३ असुन उत्तरेकडील शेवटची क्र. ४ ची पट्टी वादी क्र.३ यास देणेत आली त्याचा गट नंबर २२०/४ आहे. सदर मिळकती ७/१२ उता–यामध्ये नमुद करण्यात आले आहेत. अशाप्रकारे वादी व प्र. वादी क्र.१ यांची वरील गट नंबर २२० यात मालकी हक्क व कब्जेवहिवाट आहे. सदर गट क्रमांक २२०/१ चे क्षेत्र म्हणजेच गट क्रमांक २२० चा दक्षिणेकडील क्र.१ पट्टीचा भाग गट क्रमांक २२०/१ हा त्याप्रमाणे दक्षिणेकडून क्र.१ ची पट्टी ही पूर्वी उंचसखल असा भाग होता. प्र.वादी क्र.१ याने सदर भाग त्याचे वाटपास सन १९८२ साली वाटपाने आलेनंतर सदर भागाचे पुर्णपणे सपाटीकरण केले असुन पक्की विहीर बांधली आहे, तसेच विद्युत मोटार बसविली आहे व संपूर्ण क्षेत्र हे बागायत केले आहे. त्याकरीता त्याने कर्ज घेतले आहे. प्र.वादी वृध्द असून अडाणी आहे, त्याला लिहीता वाचता येत नाही. या गोष्टीचा गैरफायदा घेवून भुकरमापक यांना हाताशी धरून त्यांचेशी संगणमत करून तथाकथित मोजणी केल्याचे भासवून चुकीची कब्जेवहिवाट दाखवुन प्र.वादी क्र.०१ याचे गट नंबर २२० यातील दक्षिणेकडील क्र.०१ चे पट्टीचे क्षेत्र (गट नंबर २२०/१) ही सुपीक बागायत क्षेत्र हडप करण्यासाठी वादी क्र.०१ याने इतर वादींना हाताशी धरून सदरचा बनावट व खोटा दावा दाखल केला आहे. प्र.वादी क्र.०१ वृध्द आहे. त्याने त्याच्या इतर जमिनी त्याची मुले प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांच्यात वाटप केल्या असुन ते वेगळे राहत आहेत. गट नंबर २२०/१ (गट क्र.२२० मधील क्र.०१ ची पट्टी) ही जमिन प्र.वादी क्र.०१ व त्यांची वृध्द पत्नी यांचे हिस्यास वाटपाने आली आहे. सदर क्षेत्र वहिती करुन प्र.वादी क्र.०१ व त्याची पत्नी त्यांचा उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांना सदर मिळकतीशिवाय उदरनिर्वाहाचे अन्य साधन नाही.

**१०.** प्रतिवादींचे पुढे कथन असे की, गट क्र.२२० चे वाटपात सन १९८२ सालापासून आजतागायत वादी व प्र.वादीं दरम्यान कुठल्याही प्रकारचे क्षेत्राबाबत अदलाबदल झालेली नाही किंवा कोणत्याही प्रकारचे फेरवाटप झालेले नाही. प्र.वादी

क्र.०१ यांचे क्षेत्रातुन म्हणजेच गट नंबर २२० यातील पुर्वबाजूने दक्षिणेकडून क्र.१ चे पट्टीचे क्षेत्रातुन (गट नंबर २२०/१) यातुन पुर्वबाजुने ते दक्षिणेकडून उत्तरेकडे त्यांचे क्षेत्रात जाणेसाठी १० फुटी रूंदीचा रस्ता वादी क्र.०१ मोहन व वादी क्र.०३ भास्कर यांचेसाठी त्यांना प्र.वादींचे क्षेत्रातुन पूर्वबाजूने वापरण्याचा हक्क दिलेला आहे व त्याप्रमाणे ते सदर रस्त्याचा वापर करीत आहेत. त्यास प्र.वादी क्र.०१ अथवा प्र. वादी क्र.०२ व ०३ यांनी कधीही हरकत अडथळा केला नाही.

**११.** प्रतिवादींचे पुढे कथन असे की, वादी क्र.०१ मोहन शेवाळे यांचे हिस्यास आलेली गट क्र.२२० मधील दक्षिणेकडून क्र.२ पट्टीचे क्षेत्र म्हणजे गट क्र. २२०/२ त्याची पत्नी वादी क्र.०२ मंगल मोहन शेवाळे हिचे नावाने वाटप केल्याचे दाखवून प्र.वादी क्र.०२ चे नावाने दि.०७/११/२००७ रोजीचे नोंद क्र.५१८ ने केले असून सदर नोंद दि.१६/१२/२००७ रोजी मंजूर झाली आहे. तसेच वादी क्र.०३ याने देखील त्याचे हिश्याचे गट क्र.२२० मधील दक्षिणेकडून क्र.०४ पट्टीचे क्षेत्र म्हणजे गट क्र.२२०/४ हा दि.३१/०५/२००७ रोजीचे नोंद क्र.५०९ ने त्याची पत्नी सरलाबाई भास्कर शेवाळे हिचे नावाने वाटप झाल्याचे दाखवुन त्याप्रमाणे रेव्हेन्यु रेकॉर्डला नोंदी करून घेतल्या आहेत. प्र.वादी क्रे.०१ यांनी मोजणीसाठी कधीही अर्ज केलेला नाही. वादी यांनी मोजणी अधिकाऱ्यांशी संगनमत करून तथाकथीत बनावट मोजणी करून बनावट कब्जेवहिवाट दाखविली व प्र.वादी क्र.०१ यांचे मालकीचा व प्रत्यक्ष कब्जात असलेला गट नंबर २२० ची दक्षिणेकडून क्र.०१ या पट्टीचे क्षेत्र गट क्र.२२०/१ हिस्सा क्र.०३ दाखवुन वादी व प्रतिवादी यांचेत आपसात क्षेत्राची अदालाबदल झाली असे खोटे दाखवून प्र.वादी क्र.०१ चे मालकीचे व कब्जातील क्षेत्र हडप करण्याचा वादी प्रयत्न करीत आहेत.

**१२.** प्रतिवादींचे पुढे कथन असे की, प्रकाश सोंडा याचे मृत्युनंतर गट क्र.२२०/३ चे मालकी हक्क सदरी ७/१२ रेकॉर्डला मयत प्रकाशचे वारस म्हणून

प्र.वादी क्र.०१, वादी क्र.०३ व जनाबाई अभिमन यांचे नावे सन २००७ साली लागली आहेत. सदर गट क्र.२०२/३ यात वाटप झाले नाही. वर कथन केलेप्रमाणे प्र.वादी क्र.०१ यांचा गट नंबर २२० मध्ये दक्षिणेकडील क्र.१ चे पट्टीचे क्षेत्र म्हणजेच गट क्र.२२०/१ चे क्षेत्रात सन १९८२ सालापासून आजपावेतो अखंडपणे मालक म्हणून प्र. वादी क्र.०१ यांचा प्रत्यक्ष कब्जा आहे. गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील क्र.१ ची पट्टी म्हणजे गट क्र.२२०/१ क्षेत्र ०१हे–०९ आर या क्षेत्राचे प्र.वादी क्र.०१ यांचे मालकी हक्कास तसेच कब्जा वहीवाटीस वादींनी दाखविलेल्या तथाकथीत व बनावट मोजणीच्या आधारे तयार करण्यात आलेले हिस्सा फार्मचे आधारे कब्जा वहिवाटीतील क्षेत्रात अनाधिकाराने येवून सदर जमिनी हडप करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यास प्र. वादी क्र०१ याने विरोध दर्शविला. परंतु, वादी आडदांड प्रवृत्तीचे असल्यामुळे ते वादी क्र.० २ व ०४ यांना पुढे करून प्र.वादी क्र.०१ याच्याशी वाद करतात. प्र.वादी क्र.०१ यांचे कब्जात असलेले गट नंबर २२० मधील दक्षिणभागातील पट्टी क्र.०१ (गट नंबर २२०/१) यात कोथंबिरीचे पिक केले आहे. सदर पिकास पाणी देणे, खते देणे नितांत गरजेचे आहे. वादी यांनी अडथळा केल्यामुळे प्र. वादी क्र.०१ यास सदर कामे करता येत नाहीत. वादींनी प्रतिवादी क्र.०१ यास जिवे मारणेची धमकी देखील दिली आहे. त्यामुळे प्रतिवादीचे अतोनात नुकसान होत आहे.

**१३.** प्रतिवादींनी प्रतिदावा दाखल केला असुन त्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.०१ हे १९८२ साली त्यांचे मयत वडील सोंडा सावळा शेवाळे यांनी गट क्र.२२० चे करून दिलेले वाटणीप्रमाणे सदर मिळकतीच्या दक्षिणेकडील क्र.०१ चे पट्टीचे म्हणजेच गट क्र.२२०/१ चे मालक झाले आहेत व सदर गटात प्र.वादी क्र.०१ यांचा १९८२ पासून आजतागायत कब्जा वहिवाट आहे असे ठरवून व जाहीर होवून मिळावे. तसेच वादी यांनी प्र.वादी क्र.०१ यांचे क्षेत्राचे कब्जेवहिवाटीत

स्वतः अथवा गडी माणसे अथवा अन्य व्यक्तींद्वारे हिला हरकत व अडथळा करू नये, असा कायम स्वरूपी मनाई हुकूम प्रतिवादी क्र.०१ यांचे लाभात देण्यात यावा. यास्तव, वादींनी प्रस्तुत दावा खर्चासह रद्द करणेत येउन त्यांचा प्रतिदावा मंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**१४.** वादींनी नि.क्र.२४ वर प्रतिवादींच्या प्रतिदाव्यास जबाब दाखल केला असुन प्रतिवादींच्या प्रतिदाव्यातील कथने खरे व बरोबर नाहीत, तसेच, प्रतिदाव्यास मुदतीची बाधा येते, असे नमुद केले आहे. वादींनी पुढे कथन केले आहे की, प्रतिवादींनी प्रतिदाव्यात मिळकतीचे स्पष्टपणे वर्णन व चर्तुःसिमा दिले नाहीत, त्यामुळे निश्चित क्षेत्राचा बोध होत नाही. प्रतिदाव्यास एस्टॉपल बाय कन्डक्ट व आवश्यक पक्षकार या तत्वाचा बाध येतो. वादींचे पुढे कथन असे की, प्रतिवादी क्र.०१ हा आडदांड प्रवृत्तीचा असुन त्याला त्याच्या मुलांची साथ आहे, त्यामुळे तो वादींना नेहमी त्रास देत असतो. १९८२ साली झालेल्या वाटपाप्रमाणे दक्षिणेकडील क्र.०१ ची पट्टी प्रतिवादी क्र.०१ राजाराम यांना क्र.०२ ची पट्टी वादी क्र.०१ मोहन सोंडा यांना, त्यालगत उत्तरेकडे पट्टी क्र.०३ प्रकाश सोंडा यांना व उत्तरेकडील क्र.०४ ची पट्टी वादी क्र.०३ भास्कर सोंडा यांना देण्यात आली होती. त्याप्रमाणे वादीनी त्यांच्या जमिनीत भरपूर सुधारणा केली आहे. उत्तरेकडील क्र.०१ च्या पट्टीत देखील वादी क्र.०३ भास्कर यांनी विहिर खोदली असुन जमिन बागायत केली आहे. परंतू त्यानंतर प्रकाश सोंडा दि.२९/०५/१९८९ रोजी मयत झाला. मयत प्रकाश याला कोणीही कायदेशिर वारस नव्हते. त्यामुळे वादी क्र.०१, ०३ व प्रतिवादी क्र.०१ तसेच त्यांची बहिण जनाबाई हे कायदेशिर वारस लागले आहेत. सन २००७ मध्ये वादी, प्रतिवादी यांनी आपआपसात दावा मिळकत व इतर मिळकतींमध्ये फेरवाटप करुन घेतले असुन त्याचवेळी कब्जांमध्ये देखील बदल झाले आहेत. त्याबाबत नोंद क्र.४९६ झाली आहे. सन २००७ नंतरही प्रत्यक्षात खातेफोड झाली नसल्याने व मयत प्रकाश

यांचे हिश्याचे मिळकतीमध्ये देखील खातेफोड होवून क्षेत्र दर्शविलेले नसल्यामुळे वादी क्र.०१, ०३ व प्रतिवादी क्र.०१ यांनी प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीप्रमाणे मोजणी करून घेवून क्षेत्र दुरुस्त करुन खातेफोड करुन पोटहिस्से करुन घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे समजुतपत्र करारनामा दि.१२ जानेवारी २०१५ रोजी लिहिण्यात येउन नोंदणीकृत करण्यात आला. त्यानुसार प्रतिवादी क्र.०१ च्या संमतीने वादी क्र.०१ मोहन सोंडा यांनी पोटहिस्सा मोजणीकामी भुमी अभिलेख कार्यालय कळवण यांच्याकडे अर्ज केला होता. सदर अर्जावरुन प्रत्यक्ष जागेवर असलेल्या कब्जावहिवाटीप्रमाणे दि.१७/०४/२०१५ रोजी मोजणी करण्यात आली व त्यावेळी जबाब नोंदविण्यात आले. प्रतिवादी क्र.०१ यांनी देखील भुकर मापक यांचेसमक्ष त्यावेळी जबाब दिला आहे. त्याप्रमाणे हिस्सा फॉर्म क्र.०४ तयार करण्यात आला असुन दाव्यात वर्णन केल्याप्रमाणे प्रत्यक्ष कबजावहिवाट आजही आहे. प्रतिवादी क्र.०१ चा दक्षिणेकडील क्र.०१ चे पट्टीत कब्जा नाही. प्रतिवादी क्र.०१ चे कब्जात गट क्र.२२०/२ पैकी मध्यभागाची पट्टी असुन याची माहिती प्रतिवादी क्र.०१ ला आहे. उत्तरेकडील क्र.०१ ची पट्टी वादी क्र.०३ व ०४ यांचे कब्जात असुन दक्षिणेकडील २२०/३ ही वादी क्र.०१ व ०२ यांचे कब्जात आहे. त्याचप्रमाणे पुर्वेकडे १० फुट रुंदीचा रस्ता दक्षिणेकडून उत्तरेकडे जाण्यायेण्यासाठी ठेवलेला आहे.

**१५.** वादींचे पुढे कथन असे की, प्रतिवादी क्र.०१ हा पुन्हा आडदांडपणा करीत असुन त्याला वाटप मान्य नाही, असे म्हणत आहे. त्यावरुन प्रतिवादी क्र.०१ व त्याच्या मुले भांडण करुन वादींना विनाकारण त्रास देत आहेत. शेती हेच वादींचे उपजिवीकेचे मुख्य साधन आहे. प्रतिवादी क्र.०१ ने मुलांच्या मदतीने पुर्व बाजुला असलेला नाला सपाट करुन बदल करुन रस्ता बंद करण्याचा प्रयत्न केला होता. परंतू पोलिस स्टेशनला अर्ज दिल्याने प्रतिवादी क्र.०१ ने काम थांबविले होते. खोटा प्रतिदावा करुन त्याचा गैरफायदा घेण्याचा प्रतिवादी क्र.०१ प्रयत्न करीत आहे.

प्रतिवादी क्र.०१ चा आता दक्षिणेकडील भागावर कब्जा नाही. सदर भाग हा मोहन सोंडा, मंगलाबाई मोहन यांचे कब्जात आहे. सदर भाग गट क्र.२२०/३ असा आहे. परंतू प्रतिवादी क्र.०१ महसुल अधिकारी यांना दम देत असल्याने हिस्सा फॉर्म क्र.०४ वरुन अद्याप दुरुस्ती झालेली नाही. यास्तव, प्रतिदावा खोटा असुन तो खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**१६.** वादींतर्फे वादी क्र.०१ श्री.मोहन सोंडा शेवाळे यांनी स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.३० कडे दाखल केले आहे. वादींतर्फे मोजणीदार धनंजय साहेबराव सोनवणे सा.क्र.०२ यांची साक्ष नि.क्र.५२ कडे नोंदविण्यात आली आहे. वादींतर्फे पुर्शिस नि.क्र.५४ दाखल करुन, त्यांचा पुरावा बंद केला. वादींतर्फे सदर दाव्याच्या पृष्टयर्थ गट क्र.२२०/१, २२०/२, २२०/३, २२०/४ चे सातबारा उतारे नि.क्र.३५ ते ३८, ड पत्रक नोंद क्र.७१, ४९१, ४९६, ५०९, ५१८ चे प्रती अनुक्रमे नि.क्र.३९ ते ४३, हिस्सा फॉर्म क्र.०४ चा उतारा नि.क्र.७९, पोलीस ठाण्यात दि.०३.०५.२०१५ व ०७.०२.२०१५ रोजी दिलेल्या फिर्यादची प्रत अनुक्रमे नि.क्र.४४ व ४५, मोजणी रजिस्टर क्र.५०/२०१५ च्या नकाशाची प्रत नि.क्र.५३, जिल्हा अधिक्षक उप अधिक्षक भुमीअभिलेख नाशिक यांच्याकडील दि.०३.०८.२०२० रोजीच्या निकालाची प्रमाणीत प्रत नि.क्र.८०, मौजे दरेभणगी येथील गट क्र.२२०/१, २२०/२, २२०/३ चे सातबारा उतारे नि.क्र.८१ ते ८३, फेरफार नोंद क्र.८८२ ची प्रमाणीत प्रत नि.क्र.८४, हे दस्त दाखल करण्यात आले आहेत.

**१७.** याउलट, प्रतिवादींतर्फे प्रतिवादी क्र.०१ राजाराम सोंडा शेवाळे यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.५८ कडे दाखल केले आहे. प्रतिवादींतर्फे श्री. विलास रामचंद्र निकम सा.क्र.०२ यांची साक्ष नि.क्र.७१ व श्री.कडु धर्मा निकम सा.क्र.०३ नि.क्र.७२ कडे नोंदविण्यात आली आहे. प्रतिवादींतर्फे पुर्शिस नि.क्र.७३

दाखल करुन, त्यांचा पुरावा बंद केला. प्रतिवादींनी त्यांच्यातर्फे कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

**१८.** वादींतर्फे श्री.एन.पी. चंद्रात्रे विधीज्ञ व प्र.वादींतर्फे विधीज्ञ श्री.बी.डी.देशमुख यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

**१९.** माझे पुर्वाधिकारी यांनी प्रस्तुत दाव्यात मुद्ये नि.क्र.२७ वर नमुद केले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नमूद केलेल्या कारणांसह देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादी हे वाटपाप्रमाणे दावामिळकतींचे मालक व कब्जेदार आहेत हे वादींनी सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी** |
| ०२. | वादींना दावामिळकतीच्या पुर्वबाजुने १० फुट रूंदीचा रस्ता वापरण्याचा हक्क व अधिकार असल्याचे वादींनी सिध्द केले आहे काय? | **होकारार्थी** |
| ०३. | दावामिळकतीच्या वहिवाटीच्या वापरास प्रतिवादी हरकत अडथळा करत आहेत हे वादींनी सिध्द केले आहे काय? | **होकारार्थी** |
| ०४. | वादींनी मागणी केल्याप्रमाणे अनुतोष मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ०५. | प्रतिवादी हे दावामिळकतीतील दक्षिण बाजुकडील गट क्र.२२०/१ चे १९८२ च्या वाटपाप्रमाणे मालक व कब्जेदार असल्याचे प्रतिवादींनी सिध्द केले काय ? | **होकारार्थी** |
| ०६. | वादींनी प्रतिवादींचे गट क्र.२२०/१ च्या वहितीस व ताब्यास हरकत/अडथळा केल्याचे सिध्द केले काय ? | **होकारार्थी** |
| ०७. | काय आदेश आणि हुकूमनामा ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

### मुद्दे क्र.०१ करिता:–

२०. मुद्दे क्र.०१ ते ०३ हे एकमेकांशी सलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे एकत्रीत केलेली आहे. वादीने त्याचे शपथपत्र नि.क्र.३० कडे दाखल केले असुन त्यामध्ये त्यांचे दाव्यातील सर्व कथनांची पुनरावृत्ती केली व त्याने सरतपासात कथन केले आहे की, मिळकत गट क्र.२२० चा मुळ स.नं.१६९/१ असा आहे. वादी क्र.०१ व ०३ आणि प्रवादी क्र.०१ चे वडी सोंडा सावळा पाटील यांनी सदर मिळकत राजाराम मिला मोरे यांचेकडुन दि.१९/०४/१९६७ रोजी रजिस्टर खरेदीखताने विकत घेतली असुन त्यानुसार नोंद क्र.१३ प्रमाणित झाली आहे. त्यानंतर १९८२ साली सोंडा पाटील यांनी त्यांच्या नावावर असलेल्या मिळकतीचे तहसिलदार यांच्या परवानगीने मुलांमध्ये वाटप करून दिले त्याबाबत ड पत्रक नोंद क्र.७१ प्रमाणित झाली आहे. सदर वाटपानुसार गट क्र.२१३/ब सोंडा सावळ गट क्र.२२०/१ प्रतिवादी क्र.०१ राजाराम सोंडा, गट क्र.२२०/२ वादी क्र.०१ मोहन सोंडा, गट क्र.२२०/३ प्रकाश सोंडा व गट क्र.२२०/४ भास्कर सोंडा यांच्या नावाने करण्यात आली होती. सदर वाटपानुसार नोंद क्र.७१ प्रमाणित झाली आहे. वादींचे सरतपासातील शपथपत्रात पुढे कथन की, वादी क्र.०१ व प्र.वादी क्र.०१ यांना प्रकाश सोंडा नावाचा भाऊ होता. प्रकाश सोंडा दि.२९/०५/१९८९ रोजी मयत झाला. मयत प्रकाश अविवाहीत होता. त्यामुळे, त्याच्या नावावरील मिळकतींना वादी क्र.०१, ०२ व प्र.वादी क्र.०१ यांची त्याचे कायदेशीर वारस म्हणून नावे लागली आहेत. प्रकाश सोंडा मयत झाला त्यावेळी गट क्र.२१३/अ/१ व गट क्र.२२०/३ या मिळकती त्याच्या नावावर होत्या. प्रकाश मयत झाल्यानंतर वादी व प्र.वादींनी त्यांच्या नावावरील क्षेत्र ०१ हे–०८आर आपसात वाटुन घेतले आहे व त्याप्रमाणे ते सदर क्षेत्र वहिती करीत होते.

**२१.** वादींचे पुराव्याचे शपथपत्रातील पुढे कथन की, प्रकाश सोंडा मयत झाल्यानंतर वादी क्र.०१, ०३, प्र.वादी क्र.०१ व त्यांची बहिण जनाबाई अभिमन हिचेही नाव गट क्र.२१३/अ/१ व गट क्र.२२०/३ या मिळकतींना लागले होते. परंतु, समजुतीने जनाबाई यांनी त्यांचा मिळकतीत असलेला हिस्सा भावांच्या लाभात सोडुन दिला आहे. त्यावेळी वादी, प्र.वादी तसेच जनाबाई यांनी आपआपसात वाटप करून घेतले असुन सदर वाटपानुसार शेतांची आपआपसात आदलाबदल करुन घेतली असुन त्याप्रमाणे वादी क्र.०१, ०३ व प्र.वादी क्र.०१ हे सन २००७ सालापासुन ज्याच्या–त्याच्या शेताची वहिती करीत आहेत. वादींचे पुढे कथन की, वादी व प्रतिवादींनी आपापल्या हिश्यात जाण्या–येण्याकरीता स्वतंत्रपणे पूर्व बाजुला दक्षिणेकडून उत्तरेपर्यंतच्या हिश्यात जाण्यासाठी १० फुट रुंदीचा रस्ता ठेवला आहे. वादी व प्रतिवादी सदर रस्त्याने शेतात ये–जा करीत असतात. वादींचे पुढे कथन की, त्यानंतर वादी व प्रतिवादींनी कब्जा वहिवाटीप्रमाणे तिनही भावांमध्ये पोट हिश्याची मोजणी करुन हिस्से निश्चित करून घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी भुमी अभिलेख कार्यालयाकडे मोजणी करून मिळण्याकरीता अर्ज सादर केला होता व त्यानुसार दि.१७/०४/२०१५ रोजी भुकरमापक यांनी शेतावर येउन मोजणी केली. त्यानुसार वादी व प्रतिवादी यांच्या कब्जा वहिवाटीत असलेले हिश्यांचे पोटहिस्से करुन मोजणी नकाशा तयार केला. तसेच, हिस्सा फॉर्म क्र.०४ देखिल कब्जा वहिवाटीप्रमाणे तयार करण्यात आला असून त्याप्रमाणे ७/१२ उता–यात दुरुस्ती करण्यात येणार आहे. परंतु अद्याप हिस्सा फॉर्म क्र.०४ प्रमाणे संबंधीत तलाठी कार्यालयात ७/१२ उतारे तयार झालेले नाहीत. त्यामुळे वादींनी दाव्यासोबत पुर्वीच्या नोंदीप्रमाणे असलेले उतारे दाखल केले आहेत. परंतु आज रोजी दावामिळकती वादी क्र.०१, ०३ व प्रतिवादी क्र.०१ यांच्या कब्जेवहिवाटीत आहेत.

२२. वादींचे पुराव्याचे शपथपत्रातील पुढे कथन की, सदर मोजणी प्रमाणे गट क्र.२२०/१ चा उत्तरेकडील भाग वादी क्र.०३ व ०४ यांच्या कब्जेवहिवाटीत आहे. गट क्र.२२०/२ हे मधले क्षेत्र प्रतिवादी क्र.०१ च्या कब्जावहिवाटीत आहे. तसेच गट क्र.२२०/३ वादी क्र.०१ व ०२ यांचे कब्जा वहिवाटीत आहे. सदर पोट हिश्याची मोजणी मान्य असल्याबाबत वादी व प्र.वादींनी सहया केल्या आहेत. त्याप्रमाणे मुकरमापक यांनी हिस्सा फॉर्म नं.४ व पोटहिश्याचा नकाशा तयार केला आहे. येणेप्रमाणे सदर क्षेत्र हे ज्याच्या–त्याच्या कब्जात सन २००७ मध्ये झालेल्या वाटपापासुन आहे. वादींनी त्यांचे क्षेत्र बागायत केले आहे. वादींचे पुढे कथन की, सदर मिळकतीचे पुर्व बाजुने दक्षिणेकडे असलेल्या शीवपांदीने पुर्व बाजुकडुन १० फुट रुंदीचा वापराचा रस्ता दक्षिणेकडुन उत्तरेकडे जाण्या–येण्यासाठी वादी व प्रतिवादींना सामाईक ठेवण्यात आला असुन त्याची नोंद ७/१२ उता–यावर घेण्यात आली आहे. त्याप्रमाणे वादी क्र.०३ व ०४ सदर रस्त्याचा वापर त्यांच्या गट क्र.२२०/१ या मिळकतीत जाण्याकरीता करत असतात. त्याचप्रमाणे प्र.वादी क्र.०१ देखिल सदर रस्त्याचा वापर करीत असतो. परंतु ०२ ते ०३ महिन्यांपासुन प्रतिवादींनी आडदांडपणा सुरु केला असुन वादींना रस्त्याचा वापर करू देत नाही. तसेच, प्रतिवादी गट क्र.२२०/३ वरील वादी क्र.०१ व ०२ यांच्या कब्जावहिवाटीस हिल्ला हरकत करीत आहेत. तसेच, प्रतिवादी नाला बुजवुन जाणीवपूर्वक वादींची अडवणूक करत असतात. वादी क्र.०२ वर शस्त्रक्रिया झाली असुन त्यालाही रस्त्याच्या वापरास प्र.वादी विनाकारण हरकत करतात. वास्तविक पोटहिश्याची मोजणी होवुन ज्याचे–त्याचे हिस्से निश्चित करण्यात आले आहेत. तसेच, जाण्या–येण्याकरीता सर्वांना सामाईक रस्ता ठेवण्यात आला आहे. परंतु, प्र.वादींच्या वरील कृत्यामुळे वादींना मिळकतीत वहिती करणे अशक्य झाले आहे. वादी क्र.०१ व ०३ यांनी त्याबाबत संबंधीत पोलीस स्टेशनला तक्रारी दिलेल्या आहेत. परंतु पोलीसांनी त्याबाबत

कोणताही प्रतिबंधात्मक उपाय केला नसल्यामुळे याचा गैरफायदा घेउन प्रतिवादी वादींच्या कब्जेउपभोगास व रस्त्याच्या वापरास हिल्ला हरकत करत आहेत. दाव्यात वर्णन केल्याप्रमाणे वादींचे क्षेत्र त्यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीतील आहे. त्यांना पुर्व बाजुने रस्ता वापरण्याचा हक्क व अधिकार आहे. तसेच, प्रतिवादींनी सदर मिळकतींचे वहिवाटीस व रस्त्याचे वापरास स्वत: अगर इतरांतर्फे हरकत करू नये याकरीता त्यांना प्रस्तुत दावा दाखल करावा लागला आहे.

२३. वादीचा उलटतपास नोंदविण्यात आला. त्यामध्ये त्याने मान्य केले की, त्यांचे वडील हयात असतांना त्यांच्यात वाटप होउन गट क्र.२२० पैकी दक्षिणेकडील भाग म्हणजे गट क्र.२२०/१ हा प्रतिवादी राजाराम शेवाळे याच्या वाटयाला देण्यात आला होता. त्याला लागून असलेला उत्तरेकडील गट क. २२०/२ हा त्याच्या वाटणीला आला. त्याला लागून असलेला उत्तरेकडील गट क. २२०/३ हा प्रकाश शेवाळे याच्या वाटणीला आला व त्याला लागून असलेला उत्तरेकडील गट क २२०/४ हा भास्कर शेवाळे याच्या वाटयाला आला. प्रकाश शेवाळे हा अंदाजे सन १९८३–८४ मध्ये मयत झाला. त्यांच्या शेतातून गट क २२०/१, २२०/३ व २२०/४ मध्ये जाण्यासाठी पूर्व बाजूने दक्षिण–उत्तर असा रस्ता आहे. त्यांच्या गटात जाण्यासाठी गट क २२०/१.२२०/३ व २२०/४ मधून दक्षिणेकडून उत्तरेकडे असणा–या रस्त्यावरुन तो जातो. सदर रस्त्याची नोंद साताबरा उता–यावर झालेली नाही. गट क. २२०/१ मध्ये पक्की विहिर आहे. सदर विहिरीवर मोटर आहे व त्याचे पाणी प्रतिवादी क्र.०१ हे गट क्र.२२०/१ साठी वापरतात. प्रकाश शेवाळे याच्या मृत्युनंतर गट क २२०/३ ला वारस म्हणून वादी व प्रतिवादींची नोंद झाली. सदर नोंद आज देखील आहे. त्याच्या वाटणीला आलेला गट क्र.२२०/२ त्याने त्याची पत्नी मंगलाबाई हिच्या नावावर वाटपाने दिला. भास्कर

याच्या वाट्याला आलेला गट कः २२०/४ हा त्याने त्यानी पत्नी सरलाबाई हिच्या नावावर वाटपाने दिला. आज रोजी सदर वाटपाप्रमाणे सर्वांची कब्जे वहिवाट आहे. त्याच्या प्रतिज्ञापत्रात परीच्छेद कमांक ४ मध्ये नमूद केलेला मजकूर "प्रकाश सोंडा मयत झाल्यानतर वादी १.३ तसेन प्रतिवादी क १ व त्यांनी बहिण जनाबाई अभिमन हिचेही नाव गट क २१३/अ/१ व गट क २२०/३ या मिळकतींना लागले होते परतु समजूतीने जनाबाई यांनी आपला मिळकतीत असलेला हिस्सा भावांच्या लाभात सोडून दिलेला आहे त्यावेळी वादी प्रतिवादी तसेच जनाबाई यांनी आपापसात वाटत करुन घेतले असून सदर वाटपानुसार शेतांची आपापसात अदलाबदल करुन घेतली आहे" हा मजकूर खरा आहे. सदर अदलाबदली बाबत त्यांनी कोणताही नोदणीकृत दस्त करुन घेतलेला नाही. तसेच, सदर अदलाबदलीबाबत त्याच्या तोंडी कथनाव्यतिरीक्त त्याच्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. त्याबाबतचे कागदोपत्री पुरावे दाव्यासोबत दाखल केले आहेत. प्रकाश शेवाळे हा मयत झाल्यावर त्याचे क्षेत्र वादी व प्रतिवादीनी आपापसात वाटून घेतल्याबात कोणताही दस्त नाही. जनाबाईने हिने गट क्र.२१३/अ/१ व गट क. २२०/३ या मिळकतीतील तिचा हक्क सोडून दिल्याबाबत हक्कसोडपत्र केलेले नाही. प्रकाश शेवाळे याच्या गट क २२०/३ यापैकी त्याच्या वाटयाला किती क्षेत्र आले हे त्याला सांगता येणार नाही. तसेच गट क २२०/३ पैकी कोणाच्या हिस्स्याला किती क्षेत्र गेले हे मला सांगता येणार. सदर मोजणी किती तारखेला झाली हे त्याला सांगता येणार नाही. त्याने सदर फिर्याद दिनांक ३/५/२०१५ रोजी कळवण पोलीस ठाण्यात दिली होती. सदर फिर्याद त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवली होती.

**२४.** वादींतर्फे मोजणीदार सा.क्र.०२ धनंजय सोनवणे याने सरतपासात कथन केले की, दि.३०/१/२००९ पासून ते भूमी अभिलेख कार्यालय येथे कार्यरत

आहे. ते, शिरपूर, कळवण, चांदवड, नाशिक, इगतपूरी व सध्या पुणे भूमी अभिलेख कार्यालयात काम केलेले आहे. ते भूमी अभिलेख कार्यालय कळवण येथे भूकरमापक म्हणून सन २०१२ ते २०१५ या कालावधीत कार्यरत होते. सन २०१५ पर्यंत त्यांनी सुमारे ३५० मोजण्या केल्या आहेत. ते भूमी अभिलेख कार्यालय, कळवण येथे कार्यरत असतांना वादी मोहन सोंडा शेवाळे यांनी गट क. २२० या गटाचे पोट हिस्से मोजणीकामी अर्ज केला होता. सदर अर्जाला मो.र.क्रमांक ५०/२०१५ देण्यात आला. सदर पोट हिस्स्याच्या मोजणीसाठी त्यांची नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी पुढे असेही कथन केले की, मोजणीपूर्वी सुमारे पंधरा दिवस अगोदर त्यांनी मोजणीसाठी नोटीस काढली. वादी व प्रतिवादी यांना सदर नोटीस पाठवली त्यानुसार दिनांक १७/४/२०१५ रोजी ते गट क २२० येथे मोजणीसाठी गेले. वादी व प्रतिवादींनी दाखवलेल्या कब्जे वहिवाटीप्रमाणे त्यांनी गट क २२० च्या पोट हिस्स्याची मोजणी वादी व प्रतिवादीं समक्ष केली. सदर मोजणी प्लेन टेबल मोजणी पदधतीने करण्यात आली. अर्जदार व सह हिस्सेदार यांनी दाखवलेल्या कब्जे वहिवाटीप्रमाणे सदर मोजणी करण्यात आली. मोजणी केल्यानंतर अर्जदार व सह हिस्सेदार यांचे जाबजबाब नोंदवले व हिस्सा फॉर्म कमांक ४ प्रत्यक्ष जागेवर भरुन घेतला. त्यानंतर पुर्तताकरुन सदर कागदपत्र कार्यालयात जमा केले. मो.र.क्रमांक ५०/२०१५ चे मुळ सर्व कागदपत्र व मोजणी नकाशा आणला होता. सदर दस्तावेज त्यांच्या साक्षीतुन सिध्द करण्यात आले आहेत. सदर नकाशा निशाणी क्र.५३ वर आहे. मो.र.क्र.५०/२०१५ प्रमाणे पोट हिस्स्याची मोजणी झाल्याबाबतचा शेरा कागदपत्रात नमूद आहे.

**२५.** साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, त्यांनी पदवुत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. त्यांचह नेमणूक उप अधिक्षक भूमी अभिलेख

कार्यालयात भूकरमापक म्हणून झाली. नेमणूकीनंतर औरंगाबाद येथील भूकरमापक म्हणून त्यांचे तीन महिन्याचे प्रशिक्षण झाले. मोजणीसाठी अर्ज वादी मोहन सोंडा शेवाळी यांनी केला होता. मोजणीच्या अगोदर संबधीतांना नोटीसा काढाव्या लागतात. सदर नोटीसा त्यांनी स्वतः काढलेल्या नाहीत. ते स्वतःहून सांगतात की, हे काम कार्यालयाचे आहे न्यायालयात साक्ष देण्यासाठी नोटीसा व मुळ कागदपत्र सोबत घेवून यावे लागते. सदर नोटीसांची पोहोच त्यांनी न्यायालयात आणली नाही. मोजणी करतांना मुळ सर्वेच्या नकाशाप्रमाणे खुणा पडताळणी करण्यात आल्या. त्यांचे काम केवळ भुकरमापकाचे आहे. पोट हिस्से करण्याचे त्यांचे काम नाही. मोजणी करण्यासाठी त्यांनी प्लेन टेबल पेन सायटर, टेप, स्केल पटटी इत्यादी साहित्य नेले होते.

२६. प्रतिवादी राजाराम शेवाळे याने नि.क्र.५८ वर पुरावा प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन त्याने कथन केले आहे की, सन १९८२ साली सोंडा सावळा पाटील यांनी त्यांच्या नावावर असलेल्या दावा मिळकती वादी क्र.०१, ०३ व प्रतिवादी क्र.०१ यांचेत वाटप करून दिल्या आहेत. गट क्रमांक २२० मध्ये वाटपा पुर्वीपासून पूर्व–पश्चिम अशा ४ पट्टया (४ भाग) बांध घातले होते. सोंडा सावळा – पाटील यांनी सदर ४ पट्ट्या (४ भाग) त्यांचे ४ मुले राजाराम सोंडा, मोहन सोंडा, प्रकाश सोंडा, भास्कर सोंडा यांचेत वाटप करून दिले. त्या वाटपाप्रमाणे गट क्रमांक २२० यातील दक्षिणेकडुन क्र.०१ ची पट्टी प्र.वादी क्र.०१ राजाराम सोंडा यांना दिली. दक्षिणेकडून क्र.०२ ची पट्टी वादी क्र.०१ मोहन सोंडा यांचे वाटणीस दिली. दक्षिणेकडून क्र.०३ ची पट्टी प्रकाश सोंडा यांचे वाटणीस दिली व उत्तरेकडील शेवटची क्र.०४ ची पट्टी भास्कर सोंडा शेवाळे वादी क्र.०३ यांचे वाटणीस दिली आहे. त्यानुसार आजतागायत गट क्रमांक २२० वादी व प्रतिवादी यांच्या मालकी हक्काने कब्जेवहिवाटीत आहे.

**२७.** प्रतिवादींचे पुरावा प्रतिज्ञापत्रातील पुढे कथन की, दक्षिणेकडून क्र.१ ची पट्टी जी प्र.वादी क्र.१ यांना वाटपाने देणेत आली त्याचा गट नंबर २२०/१ असुन दक्षिणेकडून क्र.२ ची पट्टी वादी क्र.१ यांना वाटपाने देणेत आली त्याचा गट नंबर २२०/२ हा आहे तसेच दक्षिणेकडून क्र.३ ची पट्टी जी प्रकाश सोंडा यांना देणेत आली त्याचा गट नंबर २२०/३ असुन उत्तरेकडील शेवटची क्र. ४ ची पट्टी वादी क्र.३ यास देणेत आली त्याचा गट नंबर २२०/४ आहे. सदर मिळकती ७/१२ उता-यामध्ये नमुद करण्यात आले आहेत. अशाप्रकारे वादी व प्र. वादी क्र.१ यांची वरील गट नंबर २२० यात मालकी हक्क व कब्जेवहिवाट आहे. सदर गट क्रमांक २२०/१ चे क्षेत्र म्हणजेच गट क्रमांक २२० चा दक्षिणेकडील क्र.१ पट्टीचा भाग गट क्रमांक २२०/१ हा त्याप्रमाणे दक्षिणेकडून क्र.१ ची पट्टी ही पूर्वी उंचसखल असा भाग होता. प्र.वादी क्र.१ याने सदर भाग त्याचे वाटपास सन १९८२ साली वाटपाने आलेनंतर सदर भागाचे पुर्णपणे सपाटीकरण केले असुन पक्की विहीर बांधली आहे, तसेच विद्युत मोटार बसविली आहे व संपूर्ण क्षेत्र हे बागायत केले आहे. त्याकरीता त्याने कर्ज घेतले आहे. प्र.वादी वृध्द असून अडाणी आहे, त्याला लिहीता वाचता येत नाही. या गोष्टीचा गैरफायदा घेवून भुकरमापक यांना हाताशी धरून त्यांचेशी संगणमत करून तथाकथित मोजणी केल्याचे भासवून चुकीची कब्जेवहिवाट दाखवुन प्र.वादी क्र.०१ याचे गट नंबर २२० यातील दक्षिणेकडील क्र.०१ चे पट्टीचे क्षेत्र (गट नंबर २२०/१) ही सुपीक बागायत क्षेत्र हडप करण्यासाठी वादी क्र.०१ याने इतर वादींना हाताशी धरून सदरचा बनावट व खोटा दावा दाखल केला आहे. प्र.वादी क्र.०१ वृध्द आहे. त्याने त्याच्या इतर जमिनी त्याची मुले प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांच्यात वाटप केल्या असुन ते वेगळे राहत आहेत. गट नंबर २२०/१ (गट क्र.२२० मधील क्र.०१ ची पट्टी) ही जमिन प्र.वादी क्र.०१ व त्यांची वृध्द पत्नी यांचे हिस्यास वाटपाने आली आहे. सदर क्षेत्र वहिती करुन प्र.वादी क्र.०१ व त्याची पत्नी त्यांचा उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांना सदर मिळकतीशिवाय उदरनिर्वाहाचे अन्य साधन नाही.

२८. प्रतिवादींचे पुरावा प्रतिज्ञापत्रातील पुढे कथन की, गट क्र.२२० चे वाटपात सन १९८२ सालापासून आजतागायत वादी व प्र.वादीं दरम्यान कुठल्याही प्रकारचे क्षेत्राबाबत अदलाबदल झालेली नाही किंवा कोणत्याही प्रकारचे फेरवाटप झालेले नाही. प्र.वादी क्र.०१ यांचे क्षेत्रातुन म्हणजेच गट नंबर २२० यातील पुर्वबाजूने दक्षिणेकडून क्र.१ चे पट्टीचे क्षेत्रातुन (गट नंबर २२०/१) यातुन पुर्वबाजुने ते दक्षिणेकडून उत्तरेकडे त्यांचे क्षेत्रात जाणेसाठी १० फुटी रूंदीचा रस्ता वादी क्र.०१ मोहन व वादी क्र.०३ भास्कर यांचेसाठी त्यांना प्र.वादींचे क्षेत्रातुन पूर्वबाजूने वापरण्याचा हक्क दिलेला आहे व त्याप्रमाणे ते सदर रस्त्याचा वापर करीत आहेत. त्यास प्र.वादी क्र.०१ अथवा प्र. वादी क्र.०२ व ०३ यांनी कधीही हरकत अडथळा केला नाही.

२९. प्रतिवादींचे पुरावा प्रतिज्ञापत्रातील पुढे कथन की, वादी क्र.०१ मोहन शेवाळे यांचे हिस्यास आलेली गट क्र.२२० मधील दक्षिणेकडून क्र.२ पट्टीचे क्षेत्र म्हणजे गट क्र. २२०/२ त्याची पत्नी वादी क्र.०२ मंगल मोहन शेवाळे हिचे नावाने वाटप केल्याचे दाखवून प्र.वादी क्र.०२ चे नावाने दि.०७/११/२००७ रोजीचे नोंद क्र.५१८ ने केले असून सदर नोंद दि.१६/१२/२००७ रोजी मंजूर झाली आहे. तसेच वादी क्र.०३ याने देखील त्याचे हिश्याचे गट क्र.२२० मधील दक्षिणेकडून क्र.०४ पट्टीचे क्षेत्र म्हणजे गट क्र.२२०/४ हा दि.३१/०५/२००७ रोजीचे नोंद क्र.५०९ ने त्याची पत्नी सरलाबाई भास्कर शेवाळे हिचे नावाने वाटप झाल्याचे दाखवुन त्याप्रमाणे रेव्हेन्यु रेकॉर्डला नोंदी करून घेतल्या आहेत. प्र.वादी क्रे.०१ यांनी मोजणीसाठी कधीही अर्ज केलेला नाही. वादी यांनी मोजणी अधिकाऱ्यांशी संगनमत करून तथाकथीत बनावट मोजणी करून बनावट कब्जेवहिवाट दाखविली व प्र.वादी क्र.०१ यांचे मालकीचा व प्रत्यक्ष कब्जात असलेला गट नंबर २२० ची दक्षिणेकडून क्र.०१ या पट्टीचे क्षेत्र गट क्र.२२०/१ हिस्सा क्र.०३ दाखवुन वादी व प्रतिवादी

यांचेत आपसात क्षेत्राची अदालाबदल झाली असे खोटे दाखवून प्र.वादी क्र.०१ चे मालकीचे व कब्जातील क्षेत्र हडप करण्याचा वादी प्रयत्न करीत आहेत.

३०. प्रतिवादींचे पुरावा प्रतिज्ञापत्रातील पुढे कथन की, प्रकाश सोंडा याचे मृत्युनंतर गट क्र.२२०/३ चे मालकी हक्क सदरी ७/१२ रेकॉर्डला मयत प्रकाशचे वारस म्हणून प्र.वादी क्र.०१, वादी क्र.०३ व जनाबाई अभिमन यांचे नावे सन २००७ साली लागली आहेत. सदर गट क्र.२०२/३ यात वाटप झाले नाही. वर कथन केलेप्रमाणे प्र.वादी क्र.०१ यांचा गट नंबर २२० मध्ये दक्षिणेकडील क्र.१ चे पट्टीचे क्षेत्र म्हणजेच गट क्र.२२०/१ चे क्षेत्रात सन १९८२ सालापासून आजपावेतो अखंडपणे मालक म्हणून प्र. वादी क्र.०१ यांचा प्रत्यक्ष कब्जा आहे. गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील क्र.१ ची पट्टी म्हणजे गट क्र.२२०/१ क्षेत्र ०१हे–०९ आर या क्षेत्राचे प्र.वादी क्र.०१ यांचे मालकी हक्कास तसेच कब्जा वहीवाटीस वादींनी दाखविलेल्या तथाकथीत व बनावट मोजणीच्या आधारे तयार करण्यात आलेले हिस्सा फार्मचे आधारे कब्जा वहिवाटीतील क्षेत्रात अनाधिकाराने येवून सदर जमिनी हडप करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यास प्र. वादी क्र०१ याने विरोध दर्शविला. परंतु, वादी आडदांड प्रवृत्तीचे असल्यामुळे ते वादी क्र.० २ व ०४ यांना पुढे करून प्र.वादी क्र.०१ याच्याशी वाद करतात. प्र.वादी क्र.०१ यांचे कब्जात असलेले गट नंबर २२० मधील दक्षिणभागातील पट्टी क्र.०१ (गट नंबर २२०/१) यात कोथंबिरीचे पिक केले आहे. सदर पिकास पाणी देणे, खते देणे नितांत गरजेचे आहे. वादी यांनी अडथळा केल्यामुळे प्र. वादी क्र.०१ यास सदर कामे करता येत नाहीत. वादींनी प्रतिवादी क्र.०१ यास जिवे मारणेची धमकी देखील दिली आहे. त्यामुळे प्रतिवादीचे अतोनात नुकसान होत आहे. तसेच, प्रतिवादींनी प्रतिदावा मंजुर करावा अशी पुरावा प्रतिज्ञापत्रात विनंती केली आहे.

**३१.** प्रतिवादीसा.क्र.०१ याने उलटतपासात कबुल केले आहे की, सोंडा सावळा पाटील त्याचे वडिल होते. गट नं.२२० त्यांच्या वडिलांचा होता. त्यांना प्रकाश नावाचा एक भाऊ होता. तो, रामराव, भास्कर व प्रकाश असे चार भाऊ होते. प्रकाश दि.२९.०५.१९८९ रोजी मयत झाला आहे. प्रकाशचे हयातीमध्ये त्याच्या वडिलांनी १९८२ मध्ये वाटप करुन दिले होते व सदर वाटपामध्ये गट नं.२१३/ब त्याच्या विडिलांचे नावे ठेवण्यात आला होता. गट क्र.२२०/१ क्षेत्र १ हे. ९ आर त्यांना देण्यात आले होते. मोहन, भास्कर व प्रकाश यांना प्रत्येकी १ हे ८ आर क्षेत्र देण्यात आले होते. हे त्याला माहित नाही की, सदर वाटपा बाबत नोद क्र.७१ मंजुर होऊन त्याद्वारे त्यांच्या नावे ७/१२ उता–यास लागली किंवा कसे. गट क्र. २२०/१ हा उत्तरेकडील त्याला देण्यात आला होता. गट क्र. २२०/२ दक्षिणे कडील मोहन यास देण्यात आला होता. मोहनचे उत्तरेकडे प्रकाश व त्याचे उत्तरेकडे भास्कर असे वाटप झाले होते. मोजणीनुसार तयार झालेले ७/१२ उतारे त्याने पाहिलेले नाही. दक्षिणेकडील गट नं.२२०/३ हा मोहन व त्यांची पत्नी मंगल यांच्या नांवे व कब्जात आहे. पोटहिस्याची खातेफोड होऊन मंजुर झालेली नोंद क्र.८८२ त्याला माहित नाही. कोर्ट कचेरीमध्ये चालु असलेल्या प्रकरणामध्ये तोच येत असतो. नोंद क्र.८८२ विरुध्द त्याने जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे अपील दाखल केले होते. सदर अपील खारीज झाले आहे किंवा कसे त्याला माहित नाही. सदर निकाला विरुध्द त्याने आजपर्यंत अपील केले नाही. गट क्र.२२०/१, २२०/२ व २२०/३ मध्ये जाण्यासाठी पुर्व बाजुने १० फुट रस्ता ठेवलेला आहे. ७/१२ प्रमाणे झालेले पोटहिस्से त्याला मान्य नाही, त्यामुळे त्यांच्या मध्ये वाद सुरु आहे. त्याने आजपर्यंत स्वतः मोजणी करुन घेतलेली नाही.

**३२.** प्रतिवादींतर्फे विलास रामचंद्र निकम सा.क्र.०२ यांनी नि.क्र.७१ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन त्यामध्ये असे नमुद केले आहे की, ते वादी व

प्र.वादींना ओळखतात. ते मौजे दरेभणगी ता.कळवण जि.नाशिक येथील रहिवाशी असून त्यांच्या मालकीचे शेत गट क्र.२१८/अ/अ यात घर बांधुन राहत आहेत. त्यांचा गट नं.२१८/अ/अ या शेताचे बांधास लागून प्र.वादी क्र.०१ श्री.राजाराम सोंडा शेवाळे यांचे शेत गट नं.२२०/१ आहे. सदर मिळकतीत फार पुर्वीपासून साधारणतः ३० ते ४० वर्षांपासून श्री.राजाराम सोंडा शेवाळे यांचा प्रत्यक्ष कब्जा आहे. आज ही सदर गटात श्री. राजाराम सोंडा शेवाळे यांचा कब्जा असून त्यात विहिर आहे, तसेच सदर गटात त्यांनी कोबीचे पिक केले आहे. गट नं.२२०/१ चे उत्तर बांधास लागुन गट नं.२२०/२ असून त्यात मोहन सोंडा शेवाळे यांचा कब्जा आहे. त्याचे उत्तरेस गट नं.२२०/३ असून त्यात मयत प्रकाश सोंडा यांचा कब्जा होता व त्याचे उत्तरेस गट नं २२०/४ असून त्यात श्री.भास्कर सोंडा शेवाळे यांचा कब्जा आहे.

३३. साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांना साक्षीसमन्स प्राप्त झाले नाही, त्यांना साक्ष देण्यासाठी प्रतीवादी क्र.०१ राजाराम यांनी सांगितले आहे. त्याचे वादी व प्रतीवादी यांच्याशी चागले संबंध आहेत. त्यानी त्यांची शेत जमीन गट क्र. २१८/अ/अ चा ७/१२ उतारा दाखल केला नाही. वादींना ०३ भाऊ होते, त्यापैकी प्रकाश हा मयत आहे. प्रकाश यास जमीन दिलेली होती. गट क्र.२२० मध्ये ४ वाटण्या होत्या. सध्या वादी मोहन व भास्कर आणी प्र.वादी राजाराम हे दावा मिळकत वहीती करतात. गट क्र.२२०/१ हा राजाराम याचे नावे आहे. गट क्र.२२०/२ हा मोहन याच्या नावे आहे. गट क्र. २२०/३ हा प्रकाश याच्या नावे आहे. सदर बाब ते चालू ७/१२ उतारे पाहिल्यावरुन सांगत आहेत. त्यांच्यामध्ये सरकारी मोजणी झाली होती किंवा कसे हे त्यांना माहित नाही. त्यांच्या ७/१२ उता–यामध्ये खातेफोड झाली किंवा कसे त्यांना माहित नाही. तीघा भावांनी वाद मिळकतीच्या पुर्व दिशेला रस्ता ठेवला आहे. वादी व प्रतिवादी यांचा वाद वाटणीमध्ये

जमीन कमी मिळाली यावरुन सुरु आहे. ७/१२ उता–याप्रमाणे वाद मिळकतीवर ज्यांचे–त्यांचे ताबे आहेत. पुराव्याचे प्रतिज्ञापत्र वकीलांनी तयार करून ठेवले होते व त्यांनी त्यावर सही केली होती. गट क्र.२२०/१, २२०/२ व २२०/३ हे मोजणी प्रमाणे कोणत्या दिशेला आहेत हे त्यांना सांगता येणार नाहीत.

**३४.** प्रतिवादींतर्फे कडु धर्मा निकम सा.क्र.०३ यांनी नि.क्र.७२ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन त्यामध्ये असे नमुद केले आहे की, ते वादी व प्र.वादींना ओळखतात. ते मौजे दरेभणगी ता.कळवण जि.नाशिक येथील रहिवाशी असून त्यांच्या मालकीचे शेत गट क्र.२१८/अ/१/२ यात घर बांधुन राहत आहेत. त्यांचे वरील गट नं.२१८/अ/अ चे दक्षिणेस बांधास लागून श्री.विलास रामचंद्र निकम यांचे शेत गट नं.२१८/अ/अ आहे. त्याच्या मिळकतीचे पश्चिमेस २२०/१, २२०/२, २२०/३ व २२०/४. या मिळकती आहेत. गट.२२०/१ यात फार पुर्वी पासून साधारणतः ३०–४० वर्षापासून श्री.राजाराम सोंडा शेवाळे यांचा प्रत्यक्ष कब्जा आहे. आजही सदर गटात श्री.राजाराम सोंडा शेवाळे यांचा कब्जा असून त्यात विहिर आहे. तसेच सदर गटात त्यांनी कोबीचे पिक केले आहे. सदर गट नं.२२०/१ चे उत्तर बांधास लागुन गट नं.२२०/२ असून त्यात मोहन सोंडा शेवाळे यांचा कब्जा आहे. त्याचे उत्तरेस गट नं.२२०/३ असून त्यात मयत प्रकाश सोंडा यांचा कब्जा होता व त्याचे उत्तरेस गट नं.२२०/४ असून त्यात श्री.भास्कर सौंडा शेवाळे यांचा कब्जा आहे.

**३५.** साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांना साक्षीसमन्स प्राप्त झाले नाही. त्यांनी जमीन गट क्र.२२०/१, २२०/२, २२०/३ व २२०/४ चे सध्याचे ७/१२ उतारे पाहिले नाहीत, त्यामुळे गट क्र.२२०/१ कोणाच्या नावावर आहे हे ते सांगु शकत नाही. भास्कर सोंडा यांची शेत जमीन उत्तरेकडे आहे. भास्कर यांच्या लगत मोहन सोंडा यांची जमीन आहे. मोहन सोंडा यांच्या नावे गट

क्र.२२०/२ आहे. सध्या गट क्र. २२०/२ हा राजाराम सोंडा यांच्या नावावर आहे. त्यांना सदर गटांची मोजणी झाली किंवा कसे याबाबत माहित नाही.

३६. वादींच्या कथनाप्रमाणे दावामिळकत गट क्र.२२०/१ ही दक्षिणेकडील पट्टी असुन ती सन २००७ मधील वाटपाप्रमाणे त्याच्या ताब्यात आहे. तसेच, सन २०१५ साली उपअधिक्षक भुमीअभिलेख यांच्याकडील मोजणी रजिस्टर क्रमांक ५०/२०१५ अन्वये गट क्र.२२० या गटाची संपुर्ण मोजणी होउन वादी व प्रतिवादी यांच्या जागेवरील ताब्याप्रमाणे पोटहिश्शे पाडुन हिस्सा फॉर्म क्र.०४ तयार करण्यात आला व त्याप्रमाणे गट क्र.२२०/१ ही मिळकत उत्तर बाजुकडे असल्याचे दर्शवुन ती भास्कर सोंडा शेवाळे यांच्या कुटूंबियांच्या ताब्यात असल्याचे, गट क्र.२२०/२ ही मिळकत मध्यभागी दर्शवुन ती राजाराम सोंडा शेवाळे यांच्या ताब्यात असल्याचे व गट क्र.२२०/३ ही मिळकत दक्षीण बाजुकडे असल्याचे दर्शवुन ती मोहन सोंडा शेवाळे यांच्या कुटूंबियांच्या ताब्यात असल्याचे दर्शविण्यात आले व त्याप्रमाणे पुर्वीपासुन ते आजतागायत वहिवाट असल्याचे वादींनी शपथेवर कथन केले आहे. मात्र याउलट वादींनीच कथन केल्याप्रमाणे सन १९८२ साली सदर मिळकत वादी व प्रतिवादी यांचे पुर्व हक्कदार सोंडा सावळा पाटील यांच्या नावावर होती. त्यांनी त्यांच्या मुलांमध्ये वाटप करुन दिले व त्याची नोंद फेरफार क्रमांक ७१ प्रमाणे झाली. सदर वाटपाप्रमाणे गट क्र.२२०/१ ही मिळकत प्रतिवादी राजाराम शेवाळे म्हणजेच प्र.वादी क्र.०१ यांच्या हिश्यास देण्यात आली. त्यानंतर गट क्र.२२०/२ ही मिळकत वादी मोहन शेवाळे, गट क्र.२२०/३ मयत प्रकाश शेवाळे व गट क्र.२२०/४ ही प्रतिवादी क्र.०३ भास्कर शेवाळे यांच्या हिश्यास देण्यात आली होती. वादींच्या कथनाप्रमाणे गट क्र.२२०/१ ( नकाशाप्रमाणे गट क्र.२२०/३) म्हणजेच दक्षिणेकडील पट्टी ही आज रोजी त्याच्या मालकी ताब्यात आहे. सदर बाब वादींनी सिध्द केली आहे किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

**३७.** वादींनी नि.क्र.४१ कडे फेरफार क्र.४९६ ची प्रत दाखल केली आहे. सदर नोंदीचे अवलोकन करता दि.०८.०५.२००७ रोजी वादी व प्रतिवादींमध्ये आपसात वाटप झाल्याचे दिसुन येते. त्याप्रमाणे गट क्र.२२०/१ मधील विहीर व विद्युत मोटार सामाईक ठेवण्यात आली. तसेच, गट क्र.२२०/१ मधुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे जाण्यासाठी १० फुट रुंदीचा रस्ता मोहन व भास्कर म्हणजे प्रस्तुत वादी यांच्याकरीता ठेवण्यात आला. यावरुन असे दिसुन येते की, दक्षिणेकडील क्षेत्र हे प्रतिवादी राजाराम याला देण्यात आले व त्याच्या क्षेत्रातुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे म्हणजे वादी मोहन व भास्कर यांना जाण्यासाठी सदर रस्ता ठेवण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी कथन करतो त्याप्रमाणे सदरचे गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील क्षेत्र प्रतिवादी राजाराम याला देण्यात आल्याचे सदर नोंदीवरुन स्पष्ट होते. तसेच, वादीने त्याच्या उलटतपासात देखील मान्य केले की गट क्र.२२० पैकी दक्षिणेकडील गट क्र.२२०/१ हा प्रतिवादी राजाराम याच्या हिश्याला देण्यात आला होता व राजारामच्या क्षेत्राच्या उत्तरेला लागुन गट क्र.२२०/२ हे क्षेत्र वादीच्या हिश्याला देण्यात आले होते. त्यामुळे, वादी क्र.०१ हा कधीही गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पुर्वीचा गट क्र.२२०/१ चा मालक व कब्जेदार नव्हता व आजही नाही हे सिध्द होते. मो.र.क्र.५०/२०१५ अन्वये करण्यात आलेले पोटहिश्शे व फॉर्मक्र.०४ यास प्रतिवादींतर्फे हरकत घेण्यात आली असुन त्यास त्याची कधीही मान्यता नसल्याचे नमुद केले आहे. तसेच, प्रतिवादींनी स्वतः व त्यांचे साक्षीदार क्र.०२ विलास निकम व सा.क्र.०३ कडु निकम यांनी शपथेवर कथन करुन आजही प्रतिवादी राजाराम गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ च्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचा जबाब नोंदविला आहे. साक्षीदारांच्या उलटतपासात सदर बाबीस विसंगत असे कोणतेही कथन अभिलेखावर आलेले नाही. गट क्र.२२०/२ हा वादी क्र.०१ च्या हिश्यास देण्यात आल्याची बाब अभिलेखावर नि.क्र.३९वर दाखल फेरफार क्र.७१ वरुन सिध्द होते. तसेच, स्वतः वादी मोहन

सोंडा शेवाळे यांनी दि.०७.११.२००७ रोजी वाटप करुन गट क्र.२२०/२ मधील क्षेत्र त्याची पत्नी म्हणजे वादी क्र.०२ मंगल शेवाळे हिच्या नावे करुन दिल्याचे स्पष्ट होते. वादीने दावामिळकतीची मोजणी करुन गट क्रमांकाची खरी परिस्थितीत बदल करुन नकाशावर बदल करण्यात आलेले गट क्रमांक दर्शविण्यात आले. वादींचा सा.क्र.०२ मोजणीदार यांनी देखील उलटतपासात कथन केले की, पोटहिस्से करण्याचे काम त्यांचे नाही. त्यामुळे, तयार करण्यात आलेला मोजणी नकाशा नि.क्र.५३ व हिस्सा फॉर्म क्र.०४ नि.क्र.७९ हा जागेवरील वस्तुस्थितीला धरुन नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर हिस्सा फॉर्मवरुन मोजणी नकाशा नि.क्र.५३ मध्ये दर्शविण्यात आलेले गट क्रमांक वस्तुस्थितीप्रमाणे नसल्याचे स्पष्ट होते.

३८. सन १९८२ साली वादी व प्रतिवादींमध्ये झालेल्या वाटपानुसार दक्षिणेकडील गट क्र.२२०/१ क्षेत्र प्रतिवादी क्र.०१ राजाराम शेवाळे, तसेच सदर क्षेत्राच्या उत्तरेकडील गट क्र.२२०/२ मधील क्षेत्र वादी क्र.०१ मोहन शेवाळे व त्याच्या उत्तरेकडील गट क्र.२२०/३ मधील क्षेत्र वादी क्र.०३ भास्कर शेवाळे याच्या हिश्यास देण्यात आल्याची बाब सिध्द होते. वादी कथन करत असल्याप्रमाणे सन २००७ साली वादी व प्रतिवादींनी सदर क्षेत्राची अदलाबदल करुन वहिती सुरु केली ही बाब सिध्द होत नाही. त्यामुळे, वादी हा वाटपाप्रमाणे गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ (मोजणी नकाशा नि.क्र.५३ प्रमाणे गट क्र.२२०/३) चा मालक कधीही नव्हता व नाही. त्यामुळे, वादी हे मुद्या क्र.०१ सिध्द करण्यास अपयशी ठरले आहेत. करीता, मी मुद्या क्र.०१ चे निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे.

## <u>मुद्दे क्र.०२ ते ०४ करिता:-</u>

३९. वादींच्या कथनाप्रमाणे दावामिळकत गट क्र.२२० च्या पुर्व बाजुकडुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे जाण्यासाठी गट क्र.२२०/१ मधुन वहिवाटीचा रस्ता ठेवण्यात आला आहे व सदर रस्त्याच्या वापरास प्रतिवादी हे वादींना हिल्लाहरकत करत आहेत.

सदर रस्त्याचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी अभिलेखावर दाखल फेरफार क्र.४९६ नि.क्र.४१ चे अवलोकन करता त्यामध्ये गट क्र.२२०/१ मधुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे जाण्यासाठी १० फुट रुंदीचा रस्ता मोहन शेवाळे व भास्कर शेवाळे यांच्याकरीता ठेवण्यात आल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. सदर फेरफार हा दि.०८.०५.२००७ रोजीचा असुन तो दि.३०.०५.२००७ रोजी मंजुर करण्यात आला आहे. सदर फेरफार क्र.४९६ बाबत प्रतिवादींनी देखील कोणतीही हरकत नोंदविल्याचे अभिलेखावरुन दिसुन येत नाही व ती बाब देखील प्रतिवादींना मान्य असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, सदर १० फुट रुंदीच्या रस्त्याचे अस्तित्व सिध्द होते. वादींचे पुढे कथन की प्रतिवादींनी सदर रस्त्याच्या बाजुला असलेला नाला बुजून सदर रस्त्याच्या वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. वादींनी सदर बाब सिध्द करण्याकरीता नि.क्र.४४ व ४५ कडे अदखलपात्र गुन्हयाच्या नोंदी दाखल केल्याबाबत अहवाल दाखल केले आहेत. सदर अहवालांचे अवलोकन करता दि.०३.०५.२०१५ रोजी प्रतिवादींनी वादी मोहन शेवाळे यास सदर नाला बुजवुन रस्त्यास अडथळा केल्याचे नमुद केले आहे. सदर बाब वादींनी शपथपत्र नि.क्र.३० मध्ये देखील शपथेवर कथन केले आहे. सदर रस्त्याचे अस्तित्व प्रतिवादींना मान्य आहे. त्यामुळे वादींच्या सदर रस्तयाच्या वहिवाट वापरबाबतच्या हक्काचे सरंक्षण होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांनी वादींच्या सदर वहिवाट वापरास कोणत्याही प्रकारे हिल्लाहरकत व अडथळा करु नये असा वादी हे मनाईहुकूम मिळण्यास पात्र आहेत. करीता, मी मुद्या क्र.०२ व ०३ चे निष्कर्ष **होकारार्थी** व मुद्या क्र.०४ चे निष्कर्ष **अंशतः होकारार्थी** नोंदवित आहेत.

**मुद्दे क्र.०५ व ०६ करिता:-**

४०. प्रतिवादी यांनी नि.क्र.१४ वर त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन वादींविरुध्द प्रतिदावा दाखल केला आहे व ते दावा मिळकतीतील दक्षिण बाजुकडील

गट क्र.२२०/१ चे १९८२ च्या वाटपाप्रमाणे मालक व कब्जेदार असल्याचे तसेच वादींनी त्यांच्या गट क्र.२२०/१ च्या वहितीस व ताब्यास वादींनी हरकत/अडथळा केल्याचे नमुद केले आहे. वादींनी नि.क्र.४१ कडे फेरफार क्र.४९६ ची प्रत दाखल केली आहे. सदर नोंदीचे अवलोकन करता दि.०८.०५.२००७ रोजी वादी व प्रतिवादींमध्ये आपसात वाटप झाल्याचे दिसुन येते. त्याप्रमाणे गट क्र.२२०/१ मधील विहीर व विद्युत मोटार सामाईक ठेवण्यात आली. तसेच, गट क्र.२२०/१ मधुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे जाण्यासाठी १० फुट रुंदीचा रस्ता मोहन व भास्कर म्हणजे प्रस्तुत वादी यांच्याकरीता ठेवण्यात आला. यावरुन असे दिसुन येते की, दक्षिणेकडील क्षेत्र हे प्रतिवादी राजाराम याला देण्यात आले व उत्तरेकडील क्षेत्र मोहन व भास्कर यांना देण्यात आले. प्रतिवादींच्या क्षेत्रातुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे म्हणजे वादी मोहन व भास्कर यांना जाण्यासाठी सदर रस्ता ठेवण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी कथन करतो त्याप्रमाणे सदरचे गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील क्षेत्र प्रतिवादी राजाराम याला देण्यात आल्याचे सदर नोंदीवरुन स्पष्ट होते. तसेच, वादीने त्याच्या उलटतपासात देखील मान्य केले की गट क्र.२२० पैकी दक्षिणेकडील गट क्र.२२०/१ हा प्रतिवादी राजाराम याच्या हिश्याला देण्यात आला होता व राजारामच्या क्षेत्राच्या उत्तरेला लागुन गट क्र.२२०/२ हे क्षेत्र त्याच्या हिश्याला देण्यात आले होते. त्यामुळे, वादी क्र.०१ हा कधीही गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पुर्वीचा गट क्र.२२०/१ चा मालक व कब्जेदार नव्हता व आजही नाही हे सिध्द होते व प्रतिवादी क्र.०१ राजाराम याच्या हिश्यास सदर दक्षीणेकडील क्षेत्र देण्यात आल्याचे सिध्द होते. वादींच्या कथनाप्रमाणे मो.र.क्र.५०/२०१५ अन्वये करण्यात आलेले पोटहिश्शे व फॉर्म क्र.०४ यास प्रतिवादींतर्फे हरकत घेण्यात आली असुन त्यास त्याची कधीही मान्यता नसल्याचे नमुद केले आहे. तसेच, प्रतिवादींनी स्वतः व त्यांचे साक्षीदार क्र.०२ विलास निकम व सा.क्र.०३ कडु निकम यांनी शपथेवर कथन करुन आजही प्रतिवादी राजाराम गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील

गट क्र.२२०/१ च्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचा साक्ष नोंदविली आहे. साक्षीदारांच्या उलटतपासात सदर बाबीस विसंगत असे कोणतेही कथन अभिलेखावर आलेले नाही. गट क्र.२२०/२ हा वादी क्र.०१ च्या हिश्यास देण्यात आल्याची बाब अभिलेखावर नि.क्र.३९ वर दाखल फेरफार क्र.७१ वरुन सिध्द होते. तसेच, स्वतः वादी मोहन सोंडा शेवाळे यांनी दि.०७.११.२००७ रोजी वाटप करुन गट क्र.२२०/२ मधील क्षेत्र त्याची पत्नी म्हणजे वादी क्र.०२ मंगल शेवाळे हिच्या नावे करुन दिल्याचे स्पष्ट होते.

४१. वादीने दावामिळकतीची मोजणी करुन गट क्रमांकाची खरी परिस्थितीत बदल करुन नकाशावर बदल करण्यात आलेले गट क्रमांक दर्शविण्यात आले. वादींचा सा.क्र.०२ मोजणीदार यांनी देखील उलटतपासात कथन केले की, पोटहिस्से करण्याचे काम त्यांचे नाही. त्यामुळे, तयार करण्यात आलेला मोजणी नकाशा नि.क्र.५३ व हिस्सा फॉर्म क्र.०४ नि.क्र.७९ हा जागेवरील वस्तुस्थितीला धरुन नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर हिस्सा फॉर्मवरुन मोजणी नकाशा नि.क्र.५३ मध्ये दर्शविण्यात आलेले गट क्रमांक वस्तुस्थितीप्रमाणे नसल्याचे स्पष्ट होते. यावरुन गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ ही सन १९८२ साली झालेल्या वाटपापासुन प्रतिवादी क्र.०१ राजाराम शेवाळे यांच्या हिश्यास व ताब्यात देण्यात आल्याचे व तेव्हापासुन तो सदर मिळकतीचा मालक व कब्जेदार असल्याचे सिध्द होते. मात्र सन २०१५ साली मो.र.क्र.५०/२०१५ अन्वये झालेल्या मोजणीप्रमाणे वस्तुस्थिती बदलुन जागेवरील परिस्थितीप्रमाणे गट क्रमांकामध्ये बदल करण्यात आल्याचे मुद्या क्र.०१ च्या विवेचनावरुन सिध्द झाले आहे. प्रतिवादींनी शपथेवर कथन केले आहे की, सदर नकाशा तयार झाल्यापासुन वादी त्यांच्या दक्षिणेकडील गट क्र.२२०/१ च्या वहितीस हरकत अडथळा करत आहेत. अशा परिस्थितीत दक्षिणेकडील गट क्र.२२०/१ मधील मिळकतीच्या वापरास वादींकडुन प्रतिवादींना

हरकत, अडथळा होत आहे व तो यापुढेही सतत सुरु राहील्यास निश्चीतच प्रतिवादींच्या मालकी हक्कावर गदा येणार आहे, त्यामुळे त्यांना न्यायालयीन संरक्षण मिळणे न्यायोचित होईल. करीता, मी मुद्या क्र.०५ व ०६ चे निष्कर्ष **होकारार्थी** नोंदवित आहेत.

**मुद्दा क्र.०७ करिता:–**

४२. मुद्दा क्र.०१ ते ०४ च्या निष्कर्षावरुन वादी हे दावामिळकत गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ चे वाटपाप्रमाणे मालक व कब्जेदार असल्याची बाब सिध्द झाली नाही. परंतु, वादींना दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ च्या पुर्व बाजुला लागुन असलेल्या वाहीवाटीचा वापर करण्यास वादींना हक्क व अधिकार आहे ही बाब सिध्द झाली आहे व प्रतिवादींनी त्याच्या वापरास वादींना हरकत, अडथळा करु नये असा मनाईहुकूम मिळण्यास वादी पात्र आहेत.

४३. तसेच, मुद्दा क्र.०५ व ०६ च्या निष्कर्षावरुन प्रतिवादी हे दावामिळकत गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ चा सन १९८२ साली झालेल्या वाटपानुसार मालक व कब्जेदार असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रतिवादींच्या गट क्र.२२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ चा सन १९८२ साली झालेल्या वाटपानुसार मालकी हक्कास व कब्जे उपभोगास हरकत व अडथळा करु नये असा मनाईहुकूम मिळण्यास प्रतिवादी पात्र आहेत. करीता, उपरोक्त विवेचनाच्या अनुषंगाने मुद्या क्र.०७ करीता खालीलप्रमोण आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

[०१] वादींचा दावा अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

[०२] असा जाहीर ठराव करण्यात येतो की, वादींना मौजे दरेभणगी, ता.कळवण, जि.नाशिक येथील मिळकत गट क्रमांक २२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ च्या पुर्वेस असलेल्या १० फुट

रुंदीच्या रस्त्याचा वापर करण्याचा हक्क व अधिकार आहे.

[०३] प्रतिवादींना याद्वारे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी स्वतः अगर इतर कोणामार्फत मौजे दरेभणगी, ता.कळवण, जि.नाशिक येथील मिळकत गट क्रमांक २२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ च्या पुर्वेस असलेल्या १० फुट रुंदीच्या रस्त्याचा वापर करण्याचा हक्क व अधिकारास वादींना हरकत व अडथळा करु नये असा निरंतर ताकीद मनाईहुकूम प्रतिवादीं विरुध्द देण्यात येतो.

[०४] प्रतिवादींचा प्रतिदावा खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

[०५] असा जाहीर ठराव करण्यात येतो की, प्रतिवादी हे मौजे दरेभणगी, ता.कळवण, जि.नाशिक येथील मिळकत गट क्रमांक २२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ या मिळकतीचे सन १९८२ साली झालेल्या वाटपानुसार मालक व कब्जेदार आहेत.

[०६] वादींना याद्वारे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी स्वतः अगर इतर कोणामार्फतही मौजे दरेभणगी, ता.कळवण, जि.नाशिक येथील मिळकत गट क्रमांक २२० मधील दक्षिणेकडील पट्टी गट क्र.२२०/१ या मिळकतीवरील प्रतिवादींच्या मालकी हक्कास व कब्जेवहिवाटस आणि उपभोगास हरकत व अडथळा करु नये असा निरंतर ताकीद मनाईहुकूम वादीं विरुध्द देण्यात येतो.

[०७] वादींनी सदर दाव्याचा खर्च स्वतः सोसावयाचा आहे.

[०८] येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

[०९] न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.

MEGHARAJ VAMANRAO JAWALE
Digitally signed by MEGHARAJ VAMANRAO JAWALE
Date: 2026.04.17 17:03:16 +0530

[ एम. व्ही. जावळे ]

दिनांक :– १७.०४.२०२६.

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळवण.